# जाहिरात नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान
## जिल्हा परिषद, पुणे

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथे राज्य संसाधन केंद्रांतर्गत कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदे भरणे करीता खालीलप्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे.

**सदर पदांचा तपशिल व शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | प्रवर्गनिहाय तपशिल | शैक्षणिक अर्हता | अनुभव | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | ६ | अ.जा. - १, अज -१, शैक्षणिकदृष्टया मागास (इएसबीसी) -१, इमाव -१, आर्थिकदृष्टया मागास (इडब्ल्युएस) - १ खुला-१ | एम.बी.बी.एस, डी.सी.एच/ एम.डी (बालरोग) असल्यास प्राधान्य. | नवजात शिशु कक्षात कामाचा अनुभवास प्राधान्य. | मुळ एकत्रित वेतन रु ४००००/- महिना |
| २ | स्टाफ नर्स | २५ | अ.जा. - ३, अज -२, विजा अ-१, भ. ज. ब. - १ भ. ज. क. - १ शैक्षणिकदृष्टया मागास (इएसबीसी) -४, इमाव -५, आर्थिकदृष्टया मागास (इडब्ल्युएस) - २ खुला -६ | बी.एस.सी. नर्सिंग/ जी.एन.एम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावा. | नवजात शिशु काळजी कक्षात काम करण्याचा व प्रशिक्षणाचा अनुभवास प्राधान्य व संगणकाबाबत चे ज्ञान असल्यास प्राधान्य. | मुळ एकत्रित वेतन रु १२०००/- प्रति महिना |
| ३ | प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर | १ | खुला - १ | एम.बी.बी.एस व एम. डी./ डी.एन.बी. (पेडियाट्रीक्स) | नवजात अर्भक कक्षात ४ ते ५ वर्षाचा कामाचा अनुभवास प्राधान्य व संगणकाबाबत चे ज्ञान असल्यास प्राधान्य. | मुळ एकत्रित वेतन रु २५०००/- प्रति महिना |
| ४ | असिस्टंट नर्सिंग को ऑर्डिनेटर | १ | खुला - १ | बी.एस.सी. नर्सिंग/ जी.एन.एम कोर्स मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेचा असावा | नवजात शिशु काळजी कक्षात काम करण्याचा व प्रशिक्षणाचा अनुभवास प्राधान्य. | मुळ एकत्रित वेतन रु १५०००/- प्रति महिना |

**वरीलप्रमाणे पदांचा तपशिल असुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन ही पदे भरण्यात येतील.**

१) ही पदे राज्यशासनाची नियमित पदे नसून पुर्णतः कंत्राटी तत्वावर आहे. सदर नियुक्ती ही ३१ मार्च २०२० पर्यंतच्या कालावधीकरीताच आहे.

२) सदरची पदे शासनाने खंडित केल्यास आपणांस कोणतीही पुर्वसुचना न देता कार्यमुक्त करण्यात येईल.

३) सदर भरावयाच्या पदांमध्ये व जागांमध्ये बदल होऊ शकतो.

४) अपुर्ण कागदपत्रे व अपुर्ण अर्ज यांचा विचार केला जाणार नाही.

५) उमेदवारास जिल्हा आरोग्य सोसायटीकडे १०० रु च्या बॉण्ड पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

६) कोणत्याही उमेदवारास नियुक्ती देण्याचे अधिकार निवड समितीस राहील. याबाबतचा खुलासा कोणासही देणे बंधनकारक नाही.

७) अर्जदाराने अर्जाचा नमुना www.punezp.org या संकेतस्थळावरुन उपलब्ध केलेला असुन विहित नमुन्यातील अर्ज या कार्यालयात स्वहस्ते सादर करावा.

८) अर्ज दयावयाची तारीख दि. १० /०६/२०१९ पर्यंत राहील. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

९) जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग ४ था मजला जिल्हा परिषद पुणे येथे अर्ज जमा करण्यात यावे.

१०) भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे अथवा रद्द करणे/अंशतः बदल करणे किंवा पदांच्या संख्येत वाढ/घट किंवा बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भातील संपूर्ण निर्णय निवड समिती स्वतःकडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

११) सर्व उमेदवारांनी दिलेल्या ई मेल आयडी कमीत कमी एक वर्षासाठी चालु ठेवावा. पुढील सर्व पत्रव्यवहार ई मेल द्वारे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**